# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना
(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक (02482)-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326
E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna

जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक १५/०४/२०२०

(ई-मेलने/टपालाने) आपत्ती प्राधान्य

वाचाः-

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दिनांक १३/०३/२०२०, दिनांक १४/०३/२०२० आणि दिनांक १५/०३/२०२०.
४) या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दिनांक २५/०३/२०२०.
५) या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दिनांक ३१/०३/२०२०, १३/०४/२०२०.

## आदेश

ज्या अर्थी, सध्या महाराष्ट्रात नोव्हेल करोना विषाणू (nCoV-19) संसर्ग बाधित रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. करोना या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व करोन विषाणूचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होवू न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी, शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दिनांक १३/०३/२०२० पासून लागू करुन खंड-२, ३ व ४ मधील तरतुदींनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्याअर्थी, शासनाच्या दिनांक १४/०३/२०२० च्या अधिसूचने अन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम, २०२० लागू केला आहे.

ज्या अर्थी संदर्भ क्र.४ अन्वये जिल्हयात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये मनाई आदेश परिच्छेद क्रमांक ६ मधील नमूद सूचनांच्या अधिन राहून दिनांक १४/०४/२०२० रोजी पर्यत नागरी, ग्रामीण व औद्योगिक क्षेत्रात जमावबंदी आदेश लागू केलेला आहे व संदर्भ क्र. ५ च्या दिनांक १३/०४/२०२० च्या आदेशान्वये सदरील जमावबंदी दिनांक ३०/०४/२०२० रोजीपर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, **मी रविंद्र बिनवडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना** साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यांत आलेली अधिसूचना व नियमावलीमधील तरतूदीनूसार मला प्राप्त झालेल्या अधिकारा नुसार कोवीड-१९ विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्याच्या अनूषंगाने खबरदारीचा उपाय म्हणून **"जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्गाचे कामे आणि रेल्वेचे कामे या कामांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे."**

अटी व शर्ती:-

१.सद्यस्थितीत कार्यक्षेत्रावर कार्यरत मजूरांचे कॅम्पमध्ये असलेल्या व्यक्तीच्या मार्फत कामे करण्यात यावयीत. कॅम्पमध्ये बाहेरुन कोणीही नवीन मजूर आणण्यास तसेच कॅम्पवरील मजूरांना अथवा कूटुंबियांना कॅम्प साईट सोडून जाण्यास पूर्णतः प्रतिबंध करावा.
२.मजूरांना क्षेत्रीय बांधकामाच्या ठिकाणी असलेल्या कम्पमध्येच दैनंदिन जिवनावश्यक गरजा भागविण्यासाठी आवश्यक असलेली सामग्री उदा. अन्नधान्य, भाजीपाला, किराणा माल व इतर आवश्यक बाबी उपलब्ध करण्याची व्यवस्था कंत्राटदार यांनी करावी.
३.सामाजिक अंतर (Social Distancing) ठेवून प्रत्येक कामे होत असल्याचे खत्री कंत्राटदार व कंत्राटदाराचे पर्यवेक्षित अभियंतांनी करावी व त्यासाठी आवश्यक कार्यपध्दती क्षेत्रीय ठिकाणी अवलंबविण्यांत यावी. तसेच ४० पेक्षा जास्त कामगार असणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
४.कार्यक्षेत्रावरील कॅम्पमधील मजूर/कूटूंबिय, पर्यवेक्षीय कर्मचारी, अभियंते यांचेपैकी कोणालाही सदृश्य लक्षणे दिसून आल्यास त्या बाबत तातडीने महसूल/आरोग्य विभागास कळविणे व रुग्णालयात उपचारासाठी नेण्याची जवाबदारी कंत्राटदाराची राहील.
५.कोरोना विषाणूने संसर्गाबाबत सर्व मजूरांना व साईटवरील कर्मचारी यांना आरोग्य विषयक महत्वाचे मार्गदर्शक सूचना त्याचे मातृभाषेत स्पष्ठपणे अवगत करण्यांत यावेत.तसेच सूचनांचे पालन होत असल्याची खतरजमा करावी.
६. वरील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन होत असल्याची खात्री संबंधित यंत्रणेने करावी.

उपरोक्त आदेशांचे पालन न करणा-या व्यक्ती, अधिकारी / कर्मचारी, संस्था अथवा समुह यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ आणि भा.द.वि. १८६० चे कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे समजण्यात येईल आणि पुढील दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

Rav
(रविंद्र बिनवडे) भा.प्र.से.
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना
15/4/2020

जिल्हाधिकारी कार्यालय जालना सत्यमेव जयते

कृ.मा.प

प्रतिलीपी

१.मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद जालना.

३. पोलीस अधिक्षक,जालना.

४. सर्व उपविभागीय दंडाधिकारी जालना जिल्हा.

५. सर्व तहसिलदार जालना जिल्हा.

६. सर्व संबंधित यंत्रणा यांना अनुपालनास्तव.